महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
विभागीय कार्यालय, कोल्हापूर
Maharashtra Energy Development Agency (MEDA)
(Government of Maharashtra Institution)
Divisional Office, Kolhapur

सौर-१/ कोल्हापूर/पा.सं./तहसिल व उपविभागीय/ २०२२/ 821

दि. २१/११/२०२२

प्रति,
संचालक,
मे. हेन्क्स इंटरनॅशनल टेक्नोलॉजिस प्रा. लि.
वृक्षवल्ली गल्ली न.१, आनंदाविहार,
विठ्ठलवाडी, सिंहगड, पुणे- ४११०५१

विषय- कोल्हापूर जिल्ह्यातील तहसिल कार्यालय, गगनबावडा व उपविभागीय अधिकारी कार्यालय, करवीर यांच्या इमारतींवर आस्थापित केलेल्या पारेषण संलग्न सौर ऊर्जा प्रकल्पांना कार्यान्वित करण्यास असमर्थ ठरलेल्या मे. हेन्क्स इंटरनॅशनल टेक्नोलॉजिस प्रा. लि. पुणे यांचा कार्यादेश रद्द करुन त्यांचा काळ्या यादीत समावेश करणेबाबत...

संदर्भ :- १) कार्यादेश क्र. SOLAR -१/KOP/WO/RDC/KOP/SR-०७/२०२०-२१/१९ दि. ०७/०१/२०२१
२) या कार्यालयाचे पत्र क्र. सौर-१/ कोल्हापूर/पा.सं./तहसिल व उपविभागीय/एस.आर.-०७/२०२१/४१० दि.- ०९/०७/२०२१
३) या कार्यालयाचे पत्र क्र. सौर-१/ कोल्हापूर/पा.सं./तहसिल व उपविभागीय/एस.आर.-०७/२०२१/५३५ दि. ०७/०९/२०२१
४) या कार्यालयाचे पत्र क्र. सौर-१/ कोल्हापूर/पा.सं./तहसिल व उपविभागीय/एस.आर.-०७/२०२१/६६२ दि. १७/११/२०२१
५) या कार्यालयाचे पत्र क्र सौर-१/ कोल्हापूर/पा.सं./तहसिल व उपविभागीय/एस.आर.-०७/२०२१/९० दि. १७/०१/२०२२
६) या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस क्र. ०१सौर-१/ कोल्हापूर/पा.स़ं./तहसिल व उपविभागीय/एस.आर.-०७/ २०२२/१२५ दि. २५/०१/२०२२
७) या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस क्र. ०२ सौर-१/ कोल्हापूर/पा.सं./तहसिल व उपविभागीय/एस.आर.-०७/२०२२/२३७ दि. २८/०२/२०२२
८) या कार्यालयाकडील कारणे दाखवा नोटीस क्र. ०३ सौर-१/ कोल्हापूर/पा.सं./तहसिल व उपविभागीय/एस.आर.-०७/२०२२/३२४ दि. २२/०३/२०२२
९) आपला दि. ०६/०४/२०२२ रोजीचा ई-मेल.
१०) या कार्यालयाकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र. सौर-१/ कोल्हापूर/पा.सं./तहसिल व उपविभागीय/एस.आर.-०७/२०२२/६६३ दि. १५/०९/२०२२
११) मा. अपर महासंचालक, महाऊर्जा, मुख्यालय, पुणे यांचे पत्र आरईएन/जनरल पत्रव्यवहार/ २०२०-२१/ सौर/३६६१ दि. ०७/१२/२०२०
१२) मा. अपर महासंचालक, महाऊर्जा, मुख्यालय, पुणे यांचेकडील आदेश क्र. आरईएन/परिपत्रक / २०२१-२२/ १६२६ दि. २६/०४/२०२१

F:\SKS\हेंक्स तहसिल कारवाई .docx

कोल्हापूर जिल्ह्यातील तहसिल कार्यालय, गगनबावडा व उपविभागीय अधिकारी कार्यालय, करवीर यांच्या इमारतींवर अनुक्रमे ०५ कि.वॅ. व ४.५ कि.वॅ. असे एकूण ९.५ कि.वॅ. क्षमतेचे पारेषण संलग्न सौर ऊर्जा प्रकल्प आस्थापित व कार्यान्वित करण्याचे काम आपणास संदर्भ क्र. ०१ अन्वये देण्यात आले आहे. आपण प्रकल्पाची आस्थापना दि. ३१/०३/२०२१ रोजी पूर्ण केली आहे. त्याअनुषंगाने महाऊर्जा, मुख्यालयाकडील संदर्भ क्र. ११ नुसार प्रकल्पाची ८०% रक्कम या कार्यालयाकडून आपणास अदा केलेली आहे. तसेच, लाभार्थी संस्थेकडील वीज देयक प्रलंबित असल्याने सदर प्रकल्पांच्या नक्तमापन संबंधी कार्यवाही होत नसल्याने महाऊर्जा, मुख्यालयाकडील संदर्भ क्र. १२ नूसार अंतिम २०% देयकामधून नक्तमापन खर्चाच्या दुप्पट रक्कम वजा करून उर्वरित देयक आपणास अदा करण्यात आली आहे. अशा प्रकारे आपणास आजतागायत एकूण प्रकल्प खर्चाच्या ८५.२१% रक्कम या कार्यालयाकडून अदा करण्यात आली आहे.

यानंतर आपलेकडून सदर प्रकल्प संबंधित ठिकाणी वेळीच कार्यान्वित होणेसाठी लाभार्थी संस्था व महावितरण यांच्याशी समन्वय साधून प्रकल्प कार्यान्वित करणेकामी अवश्यक पाठपुरावा करणे अपेक्षित होते. परंतू आपणाकडून तसे झालेले नाही. याकरता आपणास सदर प्रकरणी संदर्भ क्र. ०२, ०३, ०४ व ०५ अन्वये, कळविण्यात देखील आले आहे.

परंतू आपणाकडून सदर प्रकल्प कार्यान्वित करणेबाबत कोणतीही कार्यवाही अद्याप झालेली नाही. या कारणे आस्थापित सौर ऊर्जा प्रकल्पांचा लाभ संबंधित लाभार्थी संस्थांना आजपावेतो मिळू शकलेला नाही. अशा परिस्थितीत प्रकल्प कार्यान्विततेसाठी झालेल्या विलंबास व त्यामुळे संबंधीत कार्यालयाचे झालेल्या आर्थिक नुकसानीस आपण सर्वस्वी जबाबदार असून आपणावर कारवाई का प्रस्तावित करण्यात येऊ नये, याबाबत आपलेकडून लेखी खुलासा संदर्भ क्र.०६,०७ व ०८ येथील कारणे दाखवा नोटीसीव्दारे मागविण्यात आला होता. परंतू त्यास आपणाकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

तसेच तहसिल कार्यालय गगनबावडा येथील प्रकल्पाच्या नेटमीटर करिता अर्ज केला असल्याचे व उपविभागीय कार्यालय, करवीर येथील वीज देयक प्रलंबित असल्याचे या कार्यालयास आपण संदर्भ क्र. ०९ अन्वये कळविले होते. त्या अनुषंगाने संबंधित महावितरण कार्यालयाकडे पाठपुरावा करून तहसिल कार्यालय, गगनबावडा येथील प्रकल्पास मंजुरी घेऊन प्रकल्प कार्यान्वित करणे अपेक्षित होते. परंतू त्या संबंधी आपणाकडून कोणतीही कार्यवाही झालेली नाही. शिवाय उपविभागीय कार्यालय, करवीर यांचेकडून दि. २०/०४/२०२२ रोजी प्रलंबित देयक अदा केले गेले होते. त्याबाबत आपणास कल्पना दिली गेली होती. त्या अनुषंगाने, आपणाकडून सदर कार्यालयासाठी महावितरणकडे नेट मीटरसाठी online अर्ज त्वरीत करणे अपेक्षित होते. परंतू आपण सदर प्रक्रिया पुर्ण केली नाही.

यानंतर देखील आपणाकडे दुरध्वनीव्दारे प्रकल्प कार्यान्वितेसाठी वारंवार पाठपुरावा करण्यात आला असता दोन्ही प्रकल्प लवकरात लवकर कार्यान्वित करून देऊ असे प्रत्येकवेळी मौखिक आश्वासन दिले गेले आहे. परंतू आपणाकडून कोणताही सकारात्मक कार्यवाही किंवा प्रतिसाद मिळू शकलेला नाही. याशिवाय सदर कामाच्या निविदेतील अटी - शर्तीनूसार दर १५ दिवसांनी कामाचा प्रगती अहवाल या कार्यालयास सादर करणे आवश्यक होते.

परंतू आपणाकडून अखेरचे २० % देयक (नक्त मापन खर्चाच्या दुप्पट रक्कम वजा करता) दिल्यानंतर प्रलंबित कामासंबंधी कोणताही प्रगती अहवाल या कार्यालयास आजपावेतो सादर केलेला नाही.

याआधारे आपणास सदर प्रकल्प कार्यान्वित करण्यास कोणतेही स्वरस्य राहिलेले नाही हे स्पष्ट होते. सदर बाब अत्यंत गंभीर असून आपणाकडून जाणीवपूर्वक या कामाकडे दुर्लक्ष केले जात आहे. तेंव्हा आपण सदर विषयी या कार्यालयाची दिशाभूल केली असून लाभार्थी संस्थेचे आर्थिक नुकसान व महाऊर्जाची नाहक बदनामी करण्याचा प्रयत्न चालविला असल्याचे दिसून येते.

या सर्व प्रकरणी आपणास जबाबदार धरून कार्यदेशातील **"TERMS AND CONDITIONS" मधील मुद्दा क्र. १३ नुसार** , सदर कार्यदेश रद्द करून त्याअंतर्गत या कार्यालयाकडे जमा उर्वरित देयक जप्त करुन सुरक्षा ठेव रक्कम आणि परफॉरमन्स् बँक गॅरंटीचे रोखीकरण करुन आपला काळ्या यादीत समावेश करण्यात येईल असे आपणास संदर्भ क्र. १० अन्वये कळवून देखील आपलेकडून कोणताही प्रतिसाद अद्यापही मिळालेला नाही. यावरून आपण सदर प्रकल्प कार्यान्वित करणेस इच्छुक नसल्याचे स्पष्ट होते.

वरील सर्व कारणांमुळे मे. हेन्क्स इंटरनॅशनल टेक्नोलॉजिस प्रा. लि. पुणे यांना संदर्भ क्र. ०१ अन्वये दिलेला कार्यादेश रद्द करण्यात येत असून त्याअंतर्गत असणारी प्रलंबित कामे विचारात घेता संदर्भ क्र. १० अन्वये कळविले प्रमाणे सदर प्रकल्पातील महाऊर्जाकडे कार्यदेशातंर्गत देय असणारी रक्कम, जमा सुरक्षा ठेव रक्कम व परफॉरमन्स् बँक गॅरंटी जप्त करण्यात येत आहे.

तसेच **मे. हेन्क्स इंटरनॅशनल टेक्नोलॉजिस प्रा. लि. पुणे** यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्यात येत असून सदर कंपनीस यापुढे महाऊर्जाकडून प्रसिध्द होणाऱ्या कोणत्याही निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होता येणार नाही.

विभागीय महाव्यवस्थापक
महाऊर्जा, विभागीय कार्यालय,कोल्हापूर

प्रत-

१. मा. महाव्यवस्थापक (सौर), -------- यांना माहितीस्तव
महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण,
औंध रोड, स्पायसर कॉलेज समोर,
पशुसंवर्धन आयुक्तालय शेजारी,
औंध, पुणे-४११ ०६७.

२. प्रादेशिक संचालक/विभागीय महाव्यवस्थापक/व्यवस्थापक, ------- यांना माहितीस्तव व योग्य कार्यवाहीस्तव
सर्व महाऊर्जा प्रादेशिक/विभागीय/जिल्हा कार्यालये,

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, ---------- यांना माहितीस्तव
सर्व जिल्हा परिषद,

४. आयुक्त/मुख्याधिकारी, ---------- यांना माहितीस्तव
सर्व महानगरपालिका/नगर पंचायत/नगर परिषद

F:\SKS\हेंक्स तहसिल कारवाई .docx